# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.02.2026** **वार-** बुधळवार

---

**जमीन**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गालगतच्या परिसरासह पुणे आणि पिंपरी-चिंचवड जवळच्या उद्योग क्षेत्रात औद्योगिक विकासासाठी आगामीकाळात १० हजार एकर जमिनीचं संपादन करण्याची तयारी सरकारने केली आहे. 'पुणे ग्रोथ हब' च्या दृष्टीनं केल्या जाणाऱ्या विकास प्रकल्पांसह नव्यानं येणारी उद्योगांची मागणी लक्षात घेता, वाहन उत्पादनासह इतर उद्योगांना चालना देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत,' अशी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू यांनी आज दिली. मराठा चेंबरच्या वतीनं आयोजित दोन दिवसांच्या 'पुणे आंतरराष्ट्रीय व्यवसाय शिखर बैठकीच्या समारोप सत्रात वेलारासू बोलत होते.

**उद्योजक**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नव्या धोरणानुसार शासकीय प्रक्रिया अधिक सुलभ करून अधिकाधिक अधिकार प्रादेशिक कार्यालयांना देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला; या नव्या धोरणाचा अधिकाधिक लाभ उद्योजकांनी घ्यावा तसंच याबाबत सर्व उद्योजकांपर्यंत माहिती पोहोचवावी, असं आवाहन प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी केलं आहे. बारामती प्रादेशिक कार्यालयाच्य वतीनं बारामती, दौंड, पुरंदर आणि इंदापूर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांसोबत नुकतीच

बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विविध औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी, उद्योजक, उद्योगांमधील मनुष्यबळ विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**<u>पशुधन</u>**

महाराष्ट्र शासनाच्या पशुसवर्धन विभागाच्या वतीनं आगामी १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परळी वैजनाथ इथं आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय पशु पक्षी महा पशुधन प्रदर्शनाच्या अधिकृत लोगोचं निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या हस्ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आज अनावरण करण्यात आलं. राज्यातील आणि राज्याबाहेरील जातीवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या आणि पक्ष्यांच्या विविध प्रजातींचं दर्शन यामध्ये घडणार आहे. आधुनिक दुग्ध व्यवसाय, चारा नियोजन आणि प्रक्रिया उद्योगांची भव्य दालनं असणार आहेत. पशुधनाचं आरोग्य, लसीकरण आणि वैज्ञानिक संगोपन यावर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्यानं आयोजित केली आहेत, अशी माहिती डॉक्टर राजेशकुमार वासनिक  यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्था, पंचायत समिती आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पशुपालक बांधवांनी या महोत्सवात सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

**<u>अवयवदान</u>**

रस्ते अपघातानंतर मेंदूमृत घोषित झालेल्या पुरंदर इथल्या 60 वर्षीय महिला शेतकऱ्याच्या अवयवदानामुळं चार जणांना नवजीवन मिळालं आहे.  रस्ते अपघातात डोक्याला मार बसल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्या कुटुंबियांनी अवयवदानाला संमती दिल्यानंतर फुफ्फुस, मूत्रपिंड आणि यकृत विविध रुग्णांमध्ये बसविण्यात आले. डॉक्टर पठारे यांनी अवयवदान प्रकियेतील समन्वयन आणि मोलाच्या योगदानाबद्दल विभागीय अवयवदान समन्वय समितीचे आभार मानले.

**<u>सेवासहयोग</u>**

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रेडिट-आधारित उपक्रम आणि सामाजिक सहभाग यांना विशेष महत्त्व देण्यात आलं आहे. याच पार्श्वभूमीवर विविध शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांसाठी ठराविक स्वयंसेवक तास पूर्ण करण्याच्या उद्देशानं सामाजिक उपक्रमांसोबत जोडल्या जात आहेत. पुण्यातील एम.ई.एस वरिष्ठ महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांनी सेवा सहयोग फाउंडेशनसोबत सामंजस्य करार करून स्वयंसेवकत्वाची औपचारिक जबाबदारी स्वीकारली आहे. सेवा सहयोग संस्थेच्या माध्यमातून वस्तीमध्ये राहणाऱ्या हजारो गरीब आणि होतकरू मुलांसाठी शालेय संच वाटप, विद्यार्थी विकास आणि शिष्यवृत्ती योजना, सेवा भोजन, किशोरी विकास योजना, स्वच्छता आणि आरोग्य जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास शिबिरं, अभ्यासिका तसंच दिव्यांग मुलांसाठी दोन विशेष केंद्रं चालवली जात आहेत. महिला सक्षमीकरण अंतर्गत स्वावलंबन आणि व्यवसाय मार्गदर्शन तसंच "समुत्कर्ष योजना " राबवून अनेक महिलांनी आपापले बचत गट स्थापन करून स्वतःचे लहान व्यवसाय सुरू करत स्वावलंबन साधलं आहे.

**<u>झोपड</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन आणि पुनर्वसन विभागामार्फत सेवाकर ऑनलाईन पद्धतीनं भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. क्युआर कोडद्वारे  सुरक्षितपणे सेवाकर भरणं शक्य झाल्यानं नागरिकांचा वेळ  वाचणार असून डिजिटल सेवांकडे महापालिकेचा आणखी एक प्रभावी टप्पा पूर्ण झाला आहे.

**<u>बदल्या</u>**

महापालिका आस्थापनेवरील एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तातडीनं बदली करण्याचे आदेश नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिले आहेत. महापालिकेच्या आस्थापनेवरील अनेक अधिकारी आणि

कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून एकाच विभागात अथवा एकाच पदावर ठाण मांडून बसले आहेत असं लांडगे यांनी आपल्या आदेशात म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**